Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's

# Shri Shiv Chhatrapati College

**Bodkenagar, Junnar (Pune)**

Affiliated to Savitribai Phule Pune University (NAAC Accredited 'A' Grade)

**BCUD, Savitribai Phule Pune University, Pune Sponsored**

## A Two Day National Level Seminar On " Status of Judicial Activism in India"

**Organized by Department of Political Science**

## CERTIFICATE

*This is to certify that*

*Prof./Dr./Mr./Miss./Smt.* Khillare Sandip Sitaram

*of* S.S.C. College Junnar *has participated*

*in the Two Day National Level Seminar on the " Status of Judicial Activism in India "*

*Organized by Department of Political Science of Shri Shiv Chhatrapati College, Junnar*

*held on 12th & 13th February 2016.*

*He/She Presented a paper / Delivered a speech entitled*

न्यायालयीन कार्यपद्धतीत मानसशास्त्रीय संकल्पनांचे उपयोजन *. Hence Certified.*

| | | | |
|---|---|---|---|
| **Prof. Rahul Pandit** | **Dr. Jainuddin Mulla** | **Dr. Bhaskar Shelke** | **Adv. Sanjay Kale** |
| Convener & H.O.D<br>Dept.of Ploitical Science | Vice Principal | Offg. Principal | President<br>J. T. S. S. P. M. |

Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

SAVITRIBAI PHULE
PUNE UNIVERSITY, PUNE

NAAC Accreditation'A' Grade

Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's

# Shri Shiv Chhatrapati College

*Bodkenagar, Junnar (Pune)*

**National Seminar on**

# Status of Judicial Activism in India

Editor -In-Chief
**Prof. Rahul Pandit**

Principal
**Dr. Bhaskar Shelke**




Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

**B.C.U.D. Savitribai Phule Pune University, Pune**

**Sponsored**

**Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's**


# Shri Shiv Chhatrapati College

*Bodkenagar, Junnar (Pune)*

***Department of Political Science***
***organized***

**National Seminar on**

# Status of Judicial Activism in India




**Date : 12 th & 13 th February 2016.**

Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

# National Seminar on

# Status of Judicial Activism in India

***organized by***
***Department of Political Science***

Date : 12 th & 13 th February 2016.

**Editor-in-cheif**
**Prof. Rahul B. Pandit**
**Head of the Department,**
Department of Political Science

**Co-Editor**
**Prof. A. S. Patil**
Department of Political Science

**Co-Editor**
**Prof. V.V. Rankhamb**
Department of Political Science

**Publisher**
**Principal**
**Dr. Bhaskar Shelke**
**Shri Shiv Chhatrapati College**
*Bodkenagar, Junnar (Pune)*

© **Publisher**

**Publication**
**Shabdshri Publication, Junnar**

(The Editor, Editorial Board & Publisher assume no responsibility for statements and opinions expressed by the authors in this souvenir Abstract)

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| 1 | Public Interest Litigation: Its Use and Misuse | Dr. Ketan Govekar | 1-3 |
| 2 | Judicial Activism in India and Principles of Statutory Interpretation and Income Tax Act | Prof. Dr. Jainuddin R. Mulla | 4-10 |
| 3 | Carrying Out A Mandate Nhrc & Judiciary | Dr. Subrhansu S. Bahinipati | 11-14 |
| 4 | Changing Political Scenario & Judicial Activis | Dr. Saroj K. Mohapatra<br>Prof. Banamali Behera | 15-18 |
| 5 | Judicial Activism in India | Dr. Ajay Patil | 19-20 |
| 6 | Protection of Human Rights & Role of Judiciary | Mr. Bhong S.A. | 21-22 |
| 7 | A Review Of Judicial Activism In India | Anil K. Madhale | 23-25 |
| 8 | Human Rights, Society and Social Justice | Dr. Chandrakant R. Mandlik | 26-28 |
| 9 | Judiciary and Human Rights | Dr. V. D. Awari (HOD) | 29-30 |
| 10 | Context of Judicial Activism in India | Dr.Wahida Shaikh | 31-33 |
| 11 | Protection of Human Rights and Role of Judiciary | Dr. Neeta Bokil | 34-36 |
| 12 | Status Of Judicial Activism In India | Prof. Suresh S. Muluk | 37-39 |
| 13 | "Judicialjudgments And Social Utility With Special Reference To John Galsworthy's Play –j Justice (1910)" | Prof S. K. Joshi | 40-41 |
| 14 | Dr. Babasaheb Ambedkar's Perception In Social Justice And Role Of Judiciary | Prof. Nilesh C. Adhav | 42-44 |
| 15 | Emerging Sports Law In India | Anil Kisan Bade | 45-47 |
| 16 | Public Interest Litigation And Role Of Judiciary | Mrs. Preeti T. Pawar | 48-52 |
| 17 | Title : Status Of Judicial Activism In India | Dr. Tanpure S. Shamrao | 53 |
| 18 | Increasing Role Of Judiciary In Protection Of Human Rights | Sarika P. Shinde(ll.m.net) | 54-56 |
| 19 | Judicial Activism In India: Origins, Meaning, Causes And Lessons | Nirmal E.s. | 57-58 |
| 20 | Dr. Babasaheb Ambedkar's Thoughts On Judiciary | Prof. Satish Raste | 59-60 |
| 21 | Judicial Activism In India | Mrs. Supekar Vaishali P. | 61-63 |
| 22 | Judicialactivism Under The Indianconstitution | Prof. Dudhkawade S.R. | 64-65 |
| 23 | Judicuial Activism In India | Dr. Nandkishor N. Ugale | 66-68 |
| 24 | Judicial Activism In India: Transformative Approach | Ajay Sonawane | 69-71 |
| 25 | Dr. Ambedkar's Views On Higher Judiciary: Special Reference To 15th Constitutional Amendment | Sachin B. Pathare | 72-75 |
| 26 | Human Right's Of Agricultural Labour's Protected By Indian Judiciary: A Study | Hangarge S. Damodhar | 76-79 |
| 27 | Role Of Indian Judiciary In Protection Of Human Rights Of Women | Anna Devman Dhawale | 80-83 |
| 28 | संसद आणि न्यायालय संबंध : एक निरीक्षण | डॉ. बळीराम दत्तात्रय कटारे, | 84.88 |
| 29 | भारतीय संसद आणि न्यायालयीन सकियता | प्रा. डॉ. राजेंद्र ज्ञानोबा शिंदे | 89.96 |
| 30 | बदलत्या राजकीय परिक्षेत्रात न्यायालयीन सकियता | प्रा. डॉ. एकनाथ खांदवे | 97.98 |
| 31 | संसद व न्यायपालिका संबंध न्यायालयीन सक्रीयतेच्या संदर्भात एक दृष्टीक्षेप | प्रा. डॉ. एस्.एम्. वाघ | 99.102 |
| 32 | "मानवी हक्क संरक्षणातील कायद्याची भूमिका" | डॉ. बी. डी. तोडकर | 103.108 |
| 33 | न्यायालयाची सकियता आणि समतेचे मुलय | प्रा. संजय पंढरीनाथ गायकवाड | 109.112 |
| 34 | भारतीय राजकारण आणि न्यायालयीन सकियता | डॉ. आरगडे अंबादास रोहिदास | 113.116. |
| 35 | भारतीय न्यायालयीन सक्रियता | प्रा. भरत राठोड (सहा. प्राध्यापक) | 117.121 |
| 36 | न्यायालयीन सकियता एक समिक्षण | डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील | 122.124 |
| 37 | न्यायालयीन सक्रियता | प्रा. हारदे चंद्रकांत गोरक्षनाथ | 125.131 |


Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| 38 | भारतीय न्यायव्यवस्थेतील कौटुंबिक न्यायालयाची भूमिका | प्रा. धिरज भिमशा शाखापुरे. | १३२-१३४ |
| 39 | न्यायालयीन स्वातंत्र्य आणि भारतीय संसद | प्रा. हारगे महादेव माणिकराव | 135.137 |
| 40 | न्यायालयीन कार्यपध्दतीत मानसशास्त्रीय संकल्पनांचे उपयोजन | प्रा. खिलारे संदीप सिताराम | 137.139 |
| 41 | जनहित याचिका व न्यायालयीन भूमिका | प्रा. शरद मनसुख | 140.141 |
| 42 | लोकशाही सशक्तीकरणासाठी न्यायालयीन सक्रियतेची भूमिका | प्रमोद भगवानराव जाधव | 142.145 |
| 43 | मानवीहक्कांचे संरक्षण व न्यायालयीन सक्रीयता | प्रा. एकनाथ वाजगे | 146.148 |
| 44 | भारतीय राज्यघटना व न्यायालयीन सकीयता | श्री. सचिन नागोराव कसबे | 149.151 |
| 45 | भारतीय न्यायालयीन सकीयता एक दृष्टीक्षेप | कुचेकर एच. एस. | 152.154 |
| 46 | न्यायालयीन सक्रियेतेच्या भूमिकेमुळे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाची कोंडी? | प्रा. राजेंद्र भोईवार | 155-157 |
| 47 | न्यायपालिकेची सक्रीयता | प्रा. चंदन गणेशराज सोनाळे | 158.159 |
| 48 | न्यायालयीन सक्रियता : कारणे आणि उपाय | प्रा. डॉ. विलास आघाव<br>प्रा. डॉ. सुधाकर भालेराव | 160.162 |
| 49 | **केशवानंद भारती खटला** | **प्रा.राहुल पंडित विशाल रणखांब** | **१६३-१६४** |
| 50 | भारतातील न्यायालयीन कृतिशीलता | डॉ. बेग रेहानाआरा इस्माईल | 165.168 |
| 51 | मानवी हक्काचे संरक्षण आणि न्यायसंस्थेची भुमिका | प्रा.साळवे गौतम गणपती | 169.172 |
| 52 | जनहित याचिका :सामाजिक न्यायाची संकल्पना | प्रा. मिरकुटे ई.जी..<br>डॉ. आर . डि. शिंदे | 173.174 |
| 53 | जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रीयता | प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव | 175.176 |
| 54 | संसद, न्यायालये आणि संविधान | प्रा. माधव चोले | 177.179 |
| 55 | भारतातील न्यायालयीन सक्रियता : एक अभ्यास | प्रा. काटकांबळे ना. तुकाराम | 180.185 |
| 56 | राष्टीय एकातमतेत आणि न्यायववसथेत भारतीय राज्य घटनेची भूमिका | डॉ. प्रभाकर जगताप | 186.188 |
| 57 | डॉ. बी आर. आंबेडकर आणि न्यायपालिका | मकरंद रामराव गिरी | 189.192 |
| 58 | मानवी संरक्षणात्मक कायदे आणि न्यायालयाची भूमिका | प्रा. एल.एन.कुमारे | 193.195 |
| 59 | मानवी हक्क आणि न्यायव्यवस्था | बबन गोविंद राठोड | 196.197 |
| 60 | जनहित याचिकेमध्ये न्यायालयाची भूमिका | चौधरी प्रदीप विनायक | 198.200 |
| 61 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : ग्रामीण विकास आणि न्यायविषयक दृष्टिकोन | कमले हणमंत विठ्ठलराव | 201.205 |
| 62 | भारतीय राज्यघटनेच्या संरक्षणामध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनाची भूमिका | पटेकर संजय कारभारी | 206.208 |
| 63 | न्यायालयीन सक्रीयता आणि भारतीय लोकशाही | व्हि. एस. संबेटवाड | 209.210 |
| 64 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे न्यायव्यवस्थे विषयक विचार | कढरे चंद्रकांत सिध्दार्थ | 211.212 |


Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

# न्यायालयीन कार्यपध्दतीत मानसषासीय संकल्पनांचे उपयोजन

प्रा. रिवलारे संदीप सिताराम
एस.एस.सी. कॉलेज, जुन्नर

**प्रस्तावना :–**

भारतीय संस्कृतीचा पुर्वइतिहास पाहता भगवान गौतम बुध्दांपासुन ते महात्मा गांधीपर्यंत अहिंसेचा मुलगामी विचार केला गेला आहे. विसाव्या शतकात भारत स्वतंत्र झाला तेव्हा सामाजिक चळवळीत अहिंसा हे निषेधाचे सक्षम अस्त्र म्हणून वापरले गेले.

आज जगाचा विचार करता सर्वत्र आक्रमकतेचे प्रमाण वाढले आहे. कौटुंबिक नातेसंबंधातील वाद, हिंसाचार, लहान मुलींवरील अत्याचार, कामाच्या ठिकाणी कुरघोडी, स्पर्धा, लैंगिक छळ, जातीय–धर्मिक दंगली, लूटमार, गुन्हेगारी, दहशतवाद, युध्द इत्यादी आक्रमकतेची रुपे पाहिली तर आक्रमकतेची कारणे सामाजिक, सांस्कृतिक, व्यक्तिगत व परिस्थितीजन्य आढळतात. आक्रमकतेची ही सर्व रुपे समजुन घेणे व त्यावर नियंत्रण व प्रतिबंध करण्यासाठी मानसशास्त्रज्ञ प्रयत्नशील आहेत. यासाठी त्यांनी आक्रमक वर्तनासाठी शिक्षा करणे, भाव–विरेचन तंत्राचा वापर, दिलगिरी व्यक्त करणे, शांत–अनाक्रमक व्यक्तिचा आदर्श समोर ठेवणे, चांगले संप्रेषण कौशल्य शिकविणे व कुटुंबाचा सहभाग इत्यादी घटक आक्रमकता कमी करु शकतात असे मत मांडले. मानवी वर्तन हा मानसशास्त्रांचा अभ्यास विषय आहे व अशा मानवी वर्तनावर नियंत्रण व प्रतिबंधासाठी मानसशास्त्राबरोबर कायदा व न्यायालयीन कार्यपध्दती महत्वाची भूमिका बजावते. कारण कायदे/मानदंड निर्माण करणारा माणुस, कायद्याचे पालन करणारा व मोडणाराही माणुसच म्हणून या कायदेशास्त्रात मानसशास्त्राचे योगदान महत्वाचे मानले जाते.

कायदा व मानसशास्त्र :–

कायदा व मानसशास्त्र या दोन्ही शाखा वेगळ्या दिसतात. असे असले तरी वकील, साक्षीदार, न्यायाधीश या सर्वच लोकांचा विचार करता त्यांच्या वर्तनाचाच अभ्यास केला जातो. मानसशास्त्र मानवी वर्तनाचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करते तर कायदा मानवी वर्तनाचे मानदंड तयार करतो. हे मानदंड/नियम मोडणा–यांना कोणता दंड, शिक्षा द्यावयाची व कोणते उपाय करायचे याविषयीचे मार्गदर्शन करतो. असे असले तरी आजही सर्वसामान्य माणसाच्या मनात न्यायालयीन कार्यपध्दती विषयी मनात गैरसमज आढळून येतात. उदा. शहाण्याने कोर्टाची पायरी कधी चढू नये असे म्हणतात.

कायदा आणि मानसशास्त्र ही दोन्ही शास्त्रे मानवी वर्तन अभ्यासतात. तरीदेखील मानसशास्त्र मानवी वर्तनाचे स्वरुप, वर्तनाचे प्रकार, बुध्दीमत्ता, स्मरण, विस्मरण, अध्ययन, भावना, विचार, संवेदन इत्यादीचा सखोल अभ्यास करते. व त्या वर्तनाविषयी सर्वसामान्य सिध्दांत मांडते. हे सिध्दांत पोलीस, वकील तसेच न्यायाधीश इत्यादी लोकांना की जे कायद्याची अंमलबजावणी करतात त्यांना माहिती असावते. एखाद्या कैद्याची पॅरोलवर केव्हा सुटका करता येईल याविषयीचा निर्णय मानसशास्त्रीय सिध्दांताद्वारे अचुकपणे करता येईल.

**पूर्वेतिहास :–**

कायदा व मानसशास्त्र याचा पुर्वेतिहास पाहता सन 1908 साली ह्युगो म्युन्स्टेरबर्ग यांच्या ग्रंथात स्मृती आणि संवेदन विषयक संशोधन साक्षीच्या बिनचुकपणाचे मूल्यमापन करु शकतील असे मत मांडले. 1909 मध्ये हेली यांनी बालगुन्हेगारी चिकित्सालयाची सुरुवात केली. 1931 साली बर्ट यांनी कायद्याचे मानसशास्त्र हे पुस्तक प्रकाशित केले. 1966 मध्ये गुन्हेगारांचे मानसशास्त्र हे पुस्तक प्रकाशित झाले तर 1977 पासून कायदेविषयक मानसशास्त्राच्या संशोधन पत्रिका प्रसिध्द होऊ लागल्या. आजही न्यायालयात घटस्फोटासाठी आलेल्या जोडप्यांना कौटुंबिक समुपदेशकाकडे पाठविले जाते की, ज्यांची नियुक्ती न्यायालयातर्फे होत आहे.

कायदेशास्त्रात मानसशास्त्राचे योगदान :–

कायदेशास्त्रात मानसशास्त्रज्ञांनी पुढीलप्रमाणे योगदान देण्याचा प्रयत्न केला आहे.

साक्षीदाराने दिलेली साक्ष किती विश्वसनीय आहे हे पाहण्यासाठी प्रायोगिक मानसशास्त्राने वेदन, संवेदन, स्मृती इ. क्षेत्रातील संशोधन उपयुक्त ठरते. संवेदन म्हणजे पंचज्ञानेंद्रियांना येणा–या अनुभवाचा अर्थ लावण्याची प्रकिया होय. उद्दिपक एकच असला तरी वेगवेगळ्या व्यक्तिंना त्याचे संवेदन वेगवेगळे होऊ



Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

शकते. संवेदनावर व्यक्तिचे वय, पुर्वानुभव, सवय, सामाजिक–आर्थिक स्थिती इ. घटकांचा प्रभाव पडतो. एखादी घटना पाहिल्यावर ब–याच काळाने साक्षीदाराची साक्ष घेताना मधल्या काळात बरेच काही घटना घडलेल्या असतात. त्यामुळे साक्षीमधील अचुकता कमी होते कारण स्मृतीच्या प्रारुपाप्रमाणे त्या घटनेचे अर्थपूर्ण संवेदन होणे, त्या माहितीचे धारणा / जतन (संकेतन) करणे आणि ती माहिती पुन्हा आठवणे यामध्ये कोठेतरी त्रुटी राहण्याचा धोका असतो.

बार्टलेट या मानसशास्त्रज्ञाने असे दाखवुन दिले की, स्मृती केवळ कमी होते असे नाही तर तिच्यामध्ये गुणात्मक फरक होतो. म्हणजेच साक्षीदार काही गोष्टी सांगायचे टाळतो, काही गोष्टी अंगच्या जोडतो किंवा काही फुगवून सांगतो. काहीवेळा त्याच्या अपेक्षा व मनोन्यास याचाही परिणाम त्यावर होतो. तसेच व्यक्तिच्या संवेदनावर तिच्या अभिवृत्ती व मुल्ये यांचाही परिणाम होतो. एखाद्या गोष्टीची स्मृती आहे तशी न राहता नव्या अनुभवामुळे त्या स्मृतीमध्ये बदल होतो.

मानसशास्त्रज्ञांच्या मते, साक्षीदारास मुक्त निवेदन करु दिल्यास साक्षीदार अधिक अचुक निवेदन करतो. मात्र त्याच्यावर प्रश्नांचा भडीमार केल्यास किंवा सुचक प्रश्न विचारल्यास चूकीची उत्तरे मिळण्याची शक्यता वाढते. यासाठी मानसशास्त्रज्ञांनी मिथ्या शोधक तंत्र (Lie detection test) विकसित केले. समोरची व्यक्ति (साक्षीदार, संशयित) खोटे सांगते की खरे सांगते याचा पडताळा घेता येतो. यासाठी एक तंत्र वापरतात व त्याद्वारे एका कागदावर आलेख मिळतो. या यंत्राच्या तारा संशयिताच्या शरीराला योग्य ठिकाणी जोडुन काही खास प्रश्न जातात. तेव्हा ती व्यक्ती भेदरुन जाते. –हदयाचे ठोके, नाडीचे ठोके यावरुन एक आलेख मिळतो. मात्र निरपराध व अपराधी यांच्या आलेखातील फरक ओळखण्यासाठी तज्ञ व्यक्तिची आवश्यकता असते.

**न्याय यंत्रणेतील प्रमुख भागीदार :–**

यामध्ये न्यायाधीश, पोलीस, साक्षीदार, वादी, प्रतिवादी, पंच इत्यादीचा समावेश होतो. न्यायाधीश पक्षपाती नसावा. असे असले तरी ब–याचदा त्याच्या आवाजाची धार, भुवया उंचावणे, चेह–यावरील भाव इ. चा परिणाम इतरांवर होतो. पोलीस खात्याकडे कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी असली तरी जनमाणसातील प्रतिमा डागळलेली दिसते. तसेच एखादा गुन्हा घडतो तेव्हा त्यात बळी पडलेल्या स्त्री–पुरुषाविषयी समाजास कणव निर्माण होत नाही. तसेच मानसशास्त्रज्ञांच्या मते प्रतिवाद्याचे लिंग, त्याचे शारीरिक रुप किंवा आकर्षण यांचा न्यायनिवाड्यावर परिणाम होतो.

निष्कर्ष :–

मानसशास्त्रज्ञांना गुन्हेगारी आणि न्याय यंत्रणेत खालीलप्रकारे योगदान करता येईल.

- पोलीस खात्यात एक मार्गदर्शक म्हणून फायदा होईल.
- न्यायालयात तज्ञ मार्गदर्शक (समुपदेशक) म्हणून बालक व प्रौढ यांचे मानसिक परिक्षण करता येईल.
- बालगुन्हेगार व मोठे गुन्हेगार यांच्या मानसिक समस्या समजून घेणे.

**संदर्भसूची :–**

1. उपयोजित मानसशास्त्र : डॉ. म.न. पलसाने, डॉ. सविता नवरे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर पुणे. (2003)
2. सामाजिक मानसशास्त्र : रॉबर्ट बॅरॉन, नायला ब्रॅन्सकोम्ब मराठी अनुवाद – साधना नातू, वैद्य व राजहंस, पिअरसन प्रकाशन (2012)



Scanned by CamScanner